# एक ऐतिहासिक स्मारक

देवळांच्या गावा...

डॉ.तुषार यशवंत सावडावकर

गेल्या १०० वर्षांत मुंबईचं आधुनिकीकरण झालं. जुन्या चाळी पाडून भव्य टॉवर्स उभे राहू लागले. रस्त्यावरच्या भाजीवाल्यांची जागा भव्य मॉल्सनी घेतली. पण काळबादेवीच्या या जुन्या गल्ल्या, जुन्या चाळी मात्र बदलल्या नाहीत. काळबादेवीतल्या सध्याच्या गुजराती/मारवाडी व्यापारी इलाख्यात आजही स्वतःचं मराठी अस्तित्व जपणारं, पूर्वीची राष्ट्रीय जनजागृतीचं प्रमुख केंद्र अशी ओळख आजही जपणारं रामवाडी राम मंदिर हे पुरातन देवालय आजही चांगल्या अवस्थेत दिमाखात उभं आहे. ही वास्तू वुसती पुरातन नसून याला राष्ट्रीय इतिहास आहे.

पेशवे काळातल्या तिलोवाडीचा मुंबई गॅजेटमध्ये रामवाडी असा उल्लेख आहे. ही तिलोवाडी इ.स.१७९६ मध्ये विठोबा कानोजी कोठारे नावाच्या एका पाठारे प्रभू सद्गृहस्थाने ईस्ट इंडिया कंपनीकडून आयोजित केलेल्या लिलावात विकत घेतली आणि तिथे स्वतःसाठी घर बांधलं. त्यात राम, लक्ष्मण, सीता व रामभक्त हनुमान या संगमरवरी सुबक मूर्ती आणून त्याची १७९६ रोजी स्थापना केली. या मंदिराला २१४ वर्षं पूर्ण झाली असून या राम मंदिरामध्ये मूर्तींची मांडणी रामपंचायतन दरबाराप्रमाणे आहे.


मंदिरातल्या सर्व मूर्ती पश्चिमाभिमुख आहेत. यामध्ये मध्यभागी संगमरवरी रामाची मूर्ती असून त्या मूर्तीबरोबर लक्ष्मण व सीता यांच्यादेखील मूर्ती आहेत. श्रीरामाचा मंडप हा पूर्णपणे चांदीने मढवलेला आहे. मंडपासमोर एक मोठा आरसा असून श्रीरामाचं दर्शन घेऊन मागे वळल्यानंतर देखील आरशातून परत एकदा रामाचे दर्शन व्हावं हा उद्देश असावा. राम मंदिराच्या उजव्या बाजूला सिद्धिविनायकाची उजव्या सोंडेची संगमरवरी मूर्ती असून डाव्या हाताला वास्तूपुरुषाची प्रतिमा पुरलेली असून त्याची रोज पूजा केली जाते. गणपतीच्या डाव्या बाजूला श्री पंतमहाराज बाळेकुंद्री यांची पंचधातूची मूर्ती आहे. याच मूर्तीच्या बाजूला उभा दरबारी मारुतीची संगमरवरी मूर्ती असून श्री राम मंडपाच्या डाव्या बाजूला श्री इंद्रायणी देवीची सिंहारूढ, हातात शस्त्र घेतलेली मूर्ती आहे. याचा देवारा चांदी व लाकडाचा आहे. या मंदिरामधली वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट म्हणजे इथे श्री गरुड महाराजांची संगमरवरी मूर्ती प्रथमच पाहायला मिळते. त्याचा देव्हारादेखील चांदी व लाकडाने बनवलेला आहे.

१३ फेब्रुवारी ८६ रोजी अक्कलकोट स्वामी समर्थांची पंचधातूची उभी मूर्ती शिसवी देव्हाऱ्यात स्थापन केली गेली. याच्याच बाजूला चांदीच्या देव्हाऱ्यामध्ये लक्ष्मी नारायणाची संगमरवरी मूर्ती, शंखपद्म, सुदर्शन व गदाधारी मूर्ती स्थापन केलेली आहे. पण श्री राम मंदिरात पूर्वेला तोंड करून रामसन्मुख दास मारुतीची मूर्ती आहे.





सर्व फोटो : नंदू धुरंधर



मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ दोन दीपमाळा असून रामनवमी तसंच हनुमानजयंतीच्या वेळी दीपप्रज्वलन करून कृष्णजन्म आणि रामजन्माच्या वेळेस गीत गाऊन पाळणा हलवला जातो. हे पूर्ण मंदिर पेशवेकालीन पद्धतीचं, शिसवी लाकडात उभारलेलं आहे. मंदिराचं मुख्य प्रवेशद्वार वायव्येला आहे. या मंदिरात प्रवेश केल्यास वेगळ्याच आध्यात्मिक तरंगांचा अनुभव येतो.

मंदिराच्या उत्तर दिशेला क्रांतीकारक चापेकर बंधूंचं स्मारक असून याला राष्ट्रीय इतिहास आहे. ब्रिटिश काळातलं मुंबईतलं हे एकच देवालय इतर देवालयांपेक्षा निराळं होतं. लोकमान्यांच्या वेळी प्रतिसहकार चळवळीत व महात्मा गांधीच्या असहकार चळवळीत या एकच देवालयाने श्री रामजन्म, श्री कृष्ण जन्माबरोबर, शिवजन्म मोठ्या दिमाखाने साजरे केला. स्वातंत्र्याचे पोवाडे गाऊन, श्रोत्यांचं रक्त एवढे सळसळायला लावलं की फटक्यांची शिक्षा किंवा गजाआड होणं याची भीती नाहीशी केली. या मंदिरात चातुर्मासामध्ये देवतांच्या कीर्तनांबरोबर राष्ट्रपुरुषांवरची कीर्तनंदेखील होत. आजही ती परंपरा पाळली जाते.

राममंदिराच्या वास्तूचा उपयोग स्वातंत्र्यपूर्व काळात जनजागृतीचं एक ठिकाण म्हणून केला गेला. अनेक क्रांतीकारांना प्रेरणादायी वाटावं असे हे देवालय आहे. आज या देवालयात चापेकर बंधूचे राष्ट्रीय स्मारक आहे. त्या काळात वार्षिक कीर्तनकार म्हणून चापेकर बंधुंचे वडिल हरिभाऊ चापेकर कीर्तन करत. त्यांच्या कीर्तनात त्यांचे ३ सुपुत्र त्यांना साथ देत. ज्येष्ठ पुत्र दामोदर हा टाळ वाजवी, दुसरा बाळकृष्ण तबल्याची साथ देई व तिसरा वासुदेव मृदुंगाची साथ देई. त्यांच्या सुश्राव्य कीर्तनाला रसिक भक्त अमाप गर्दी करत. त्या काळात मुंबई-पुण्यात प्लेगची साथ सुरु झाली व त्यात बरीच माणसं दगावली. प्लेगच्या नावाखाली इंग्रज लष्कराने गरीब जनतेवर अत्याचार सुरु केले व त्यासाठीच लो. टिळकांनी वर्तमानपत्रातून जहाल लिखाण केलं व लोकांमध्ये जनजागृती व्हायला सुरुवात झाली. या गोष्टीचा बदला म्हणून लष्करी अधिकारी रॅण्ड आणि आयर्स्ट या दोघांची पुण्याला गणेश खिंडीत चापेकर बंधूंनी २२ जून १८९७ रोजी हत्या केली व त्यानंतर लगेच २४ जूनला परत कीर्तनाच्या साथीला येऊ लागले. यानंतर चापेकर बंधूंना फाशी देण्यात आली.

ज्या श्रीरामाच्या प्रेरणेने चापेकर बंधूंनी इंग्रज अधिकाऱ्यांचा वध केला तेच हे काळबादेवीचं श्रीराम मंदिर. महाराष्ट्र शासनाचे पुरातन विभागाचे अभ्यासू अधिकारी व मुंबई विद्यापीठाचे विद्यार्थी इतिहासाच्या अभ्यासासाठी इथे येतात. त्यानिमित्ताने इतिहासातल्या आठवणी पुन्हा जाग्या होतात.

mtartedit@gmail.com